पान १ वरून

अर्थव्यवस्था भक्कमच!

विचार करता महाराष्ट्राने केवळ १८.८७ टक्के इतकेच कर्ज घेतले आहे. देशात गुजरात, महाराष्ट्र आणि ओडिशा ही केवळ तीन राज्ये अशी आहेत, ज्यांचे कर्जदायित्व २० टक्क्यांपेक्षा कमी आहे, याचा अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच राजकोषीय तूट ३ टक्क्यांच्या आत ठेवणे आवश्यक असून, 'लाडकी बहीण' योजना आणि शेतकऱ्यांना दिलेल्या आर्थिक मदतीनंतरही राज्याची वित्तीय तूट २.७६ टक्के इतकी मर्यादित ठेवण्यात आली आहे. महसुली जमेच्या तुलनेत व्याज देयतेचे प्रमाण ११.५३ टक्के असून तेही केंद्र सरकारने ठरवलेल्या निकषांमध्ये आहे. केंद्राच्या निकषांपेक्षा अधिक भांडवली गुंतवणूक महाराष्ट्राने केली असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

सीबीएसईच्या पुस्तकांत मराठा साम्राज्यावर २१ पानांचा सविस्तर इतिहास : सीबीएसईच्या अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याच्या इतिहासाला योग्य स्थान देण्यात आले असून आता तब्बल २१ पानांचा सविस्तर इतिहास समाविष्ट करण्यात आला आहे. पूर्वी सीबीएसईच्या पाठ्यपुस्तकांमध्ये मराठा साम्राज्याचा उल्लेख केवळ एका परिच्छेदापुरता मर्यादित होता, तर मुघल इतिहासाला तब्बल १७ पाने दिली गेली होती. हा अन्यायकारक दृष्टिकोन आता बदलला असून केंद्र सरकारच्या पुढाकारामुळे सीबीएसईने अभ्यासक्रमात सुधारणा केल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

गुंतवणुकीत महाराष्ट्र आघाडीवर : महाराष्ट्र राज्याने उद्योग, गुंतवणूक, रोजगार निर्मिती, ऊर्जा, कृषी आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केली असून देशात सर्वांगीण विकासाचा आदर्श उभा केला आहे, गुंतवणुकीच्या बाबतीत महाराष्ट्र खूप पुढे गेला आहे. दावोसमध्ये झालेल्या १७ लाख ५७ हजार ८०१ कोटी रुपयांच्या करारांपैकी ७५ टक्के करारांची अंमलबजावणी सुरू झाली आहे. विदेशी थेट गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात अव्वल असून, २०२४-२५ मध्ये विक्रमी १ लाख ६४ हजार ७७५ कोटी रुपयांची गुंतवणूक आली. देशाच्या एकूण गुंतवणुकीपैकी ३१ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे. २०२५-२६ मध्ये आतापर्यंत ९१ हजार ३३७ कोटी रुपये एवढी परकीय थेट गुंतवणूक महाराष्ट्रामध्ये आल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

बीकेसीच्या धर्तीवर 'नवीन नागपूर'ची निर्मिती : नागपूरमध्ये मुंबईतील बीकेसीच्या धर्तीवर 'नवीन नागपूर' अर्थात आयबीएफसी (इंटरनॅशनल बिझनेस फायनान्शियल सेंटर) विकसित केले जाणार आहे. या प्रकल्पातून आयटी, वित्तीय सेवा, स्टार्टअप्स आणि कॉर्पोरेट क्षेत्रासाठी आधुनिक पायाभूत सुविधा उभारल्या जातील. या नव्या आर्थिक केंद्रामुळे नागपूर आणि विदर्भात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आणि रोजगारनिर्मिती होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

विदर्भ व मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष कमी करण्यात यश : विदर्भ आणि मराठवाड्यातील १३ लाख ८३ हजार हेक्टरचा सिंचन अनुशेष जवळपास संपुष्टात आला आहे. इंडिकेटर बॅकलॉग समितीने निश्चित केलेल्या या अनुशेषापैकी १३ लाख ३४ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यात आले असून, आता केवळ ४९ हजार हेक्टरचा अनुशेष शिल्लक आहे. हा अनुशेष प्रामुख्याने अकोला, बुलढाणा आणि हिंगोली या तीन जिल्ह्यांपुरता मर्यादित असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

भाजपचे पुन्हा धक्कातंत्र!

पाटण्याच्या बंकीपूरचे आमदार असलेले नबीन सध्या बिहार सरकारमध्ये रस्ते बांधकाम मंत्री आहेत. पंतप्रधान मोदींनी नितीन यांचे अभिनंदन करताना त्यांची ऊर्जा व समर्पण पक्षाला बळकटी देईल, असा विश्वास व्यक्त केला. नितीन नबीन हे एक तरुण, कष्टाळू नेते आहेत. मोठा संघटनात्मक अनुभव त्यांच्या गाठीशी आहे. बिहारमध्ये आमदार, मंत्री म्हणून त्यांची कारकीर्द उल्लेखनीय राहिली आहे. नम्र स्वभाव आणि व्यावहारिक कार्यशैलीसाठी ओळखले जाणारे नितीन नबीन यांची भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन, असे मोदींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटले. नबीन नव्या अध्यक्ष निवडीपर्यंत या पदावर राहतील. सूत्रांच्या माहितीनुसार नबीन हेच पक्षाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष असतील. असे झाले तर ते भाजपचे सर्वात कमी वयाचे राष्ट्रीय अध्यक्ष ठरतील. २०२० साली जे. पी. नड्डा यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली होती. २०२४ मध्ये त्यांचा कार्यकाळ पूर्ण झाला असून नव्या अध्यक्ष निवडीपर्यंत त्यांना मुदतवाढ देण्यात आली आहे.

भारताने उडवला पाकचा धुव्वा

काढणाऱ्या जॉर्जने आपल्या खेळीत १२ चौकारांसोबत एक षटकार लगावला.पाकिस्तानकडून मोहम्मद सयाम आणि अब्दुल सुभान यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले.

लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानला वेगवान गोलंदाज देवेंद्रने सुरुवातीच्या टप्प्यात तीन झटके दिले. यामुळे पाकची १३.१ षटकांत ४ बाद ३० अशी दाणादाण उडाली. मात्र, कर्णधार फरहान युसूफ (२३) आणि हुजैफा एहसानने (७०) काही काळ प्रतिकार केला. मात्र, दोघे बाद झाल्यानंतर पाकचा डाव फार काळ लांबला नाही. देवेंद्रला साथ देत फिरकीपटू कनिष्क चौहानने देखील ३ बळी घेतले.

अमानुष अत्याचार करून चिमुकलीचा खून, नराधम अटकेत

फासणाऱ्या या कृत्यानंतर काही केलेच नाही, या अविभार्वात तो कामालाही गेला. दरम्यान, त्या बेपत्ता चिमुकलीचा तपास करत असताना गुंडा विरोधी पथकाने बारा तासांत नराधमाला अटक केली आणि शहरच नाही तर राज्याला हादरवणारा हा धक्कादायक प्रकार समोर आला. शनिवारी सायंकाळी ७ ते ८ वाजण्याच्या सुमारास उर्से (ता. मावळ) हद्दीत घडली.

समीर कुमार मंडल (३५, सध्या रा. उर्से, ता. मावळ. मूळ रा. जि. गोंडा, झारखंड) असे अटक करण्यात आलेल्या नराधमाचे नाव आहे. या प्रकरणी मयत मुलीच्या आईने शिरगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत चिमुकली ही शनिवारी सायंकाळी घरी तिच्या आठ वर्षांच्या भावासोबत होती. तिचे वडील कामानिमित्त पुण्यात होते. तर, आई स्थानिक कंपनीत कामाला गेली होती. आरोपी समीर मंडल हा मयत मुलीच्या शेजारीच राहतो. त्याने मुलगी एकटीच असल्याचे पाहून तिला चॉकलेट देण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर तिला घरापासून अर्ध्या किलोमीटरवर असणाऱ्या निर्जन स्थळी नेले. त्यानंतर त्याने मुलीवर बलात्कार केला. आपण केलेला प्रकार मुलगी घरी सांगेल, या भीतीने त्याने मुलीच्या पँटने तिचा गळा आवळून खून केला. त्यानंतर आरोपी रात्री अकरा वाजता कंपनीत कामाला गेला. दरम्यान, मुलगी घरी दिसत नसल्याने रात्री नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. मुलगी हरवल्याची तक्रार त्यांनी दाखल केली. त्यानंतर गुंडा विरोधी पथकाने तपासचक्रे फिरवत आरोपीला अटक केली.

खून करून गेला कामाला; सीसीटीव्हीतून बिंग फुटले

गुंडा विरोधी पथकाला गुन्ह्याची माहिती कळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश माने, पोलीस शिपाई तौसीक शेख आणि रामदास मोहिते यांचे पथक घटनास्थळी पोहोचले. तेव्हा नातेवाईकांनी आरोपी समीर याच्याबरोबर मुलगी चॉकलेट आणायला गेल्याचे सांगितले. पोलिसांनी कंपनीतून आरोपीला ताब्यात घेतले. मात्र, तो चुकीची माहिती देत होता तसेच चॉकलेट देऊन तिला पुन्हा घरी सोडल्याचे सांगितले. मात्र, तो सांगत असलेली माहिती विसंगत वाटत होती. तसेच त्याच्या मोबाईलमध्ये अनेक अश्लील व्हिडीओ असून त्याला दारू पिण्याची सवय होती. यामुळे त्याने काही तरी वाईट केले असल्याचा पोलिसांना संशय आला. त्यानंतर पूर्ण पथक कामाला लागले. तो सांगत असलेल्या रस्त्याचे तसेच आसपासच्या परिसरातील शेकडो सीसीटीव्ही तपासले. एका फुटेजमध्ये तो मुलीसोबत जाताना दिसला, मात्र येत असताना एकटाच होता. हे फुटेज दाखवताच त्याचे बिंग फुटले आणि त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

अनुदानासाठी राज्याची तिजोरी ओसंडून वाहत नाही!

यांनी गोशाळांचे ऑडिट करणाऱ्यांचेच ऑडिट करायला हवे. गोशाळांच्या ऑडिटसाठी आमदारांची समिती नेमावी, अशी मागणी केली. यावर गोशाळांतील गायींची बायोमेट्रिक व्यवस्था निर्माण करण्याचा विचार केला जाईल, असे उत्तर मुंडे यांनी दिले.

दरम्यान, शिवसेनेचे कैलास पाटील यांनी कथित गोरक्षक गायींसह म्हशीही पकडून नेत असल्याचा आरोप केला. यावर गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी म्हशींबाबत चौकशीचे आश्वासन दिले.

राष्ट्रपतींनी फेटाळली नराधमाची दया याचिका

मर्यादा ओलांडल्या, असे न्यायालयाने म्हटले होते. विद्यमान सरन्यायाधीश सूर्यकांत हे त्यावेळी न्यायमूर्ती म्हणून खंडपीठात होते. तीन न्यायमूर्तींच्या त्या खंडपीठाने २ विरुद्ध १ अशा बहुमताने दिलेल्या निकालात अतिशय कठोर शब्दांत सुनावले होते. आरोपीने चिमुकलीचे जीवन फुलण्याआधीच अतिशय निर्दयीपणे अंत केला. दोन वर्षीय मुलीसोबत केलेले हे कृत्य 'एक घाणेरडी आणि विकृत मानसिकता' दर्शवते. ही क्रौयाची परिसीमा गाठणारी एक भयानक कथा आहे. पीडित मुलगी अवघी दोन वर्षांची होती. आरोपीने तिचे अपहरण केले आणि तिच्या शेवटच्या श्वासापर्यंत चार ते पाच तास तिच्यावर अत्याचार करत राहिला. अपीलकर्त्याने समाजातील वाईट गोष्टींपासून त्या मुलीला पितृतुल्य प्रेम, आपुलकी आणि संरक्षण देण्याऐवजी आपल्या वासनेची शिकार बनवले, असे निकालात नमूद करण्यात आले होते. राष्ट्रपती भवनने जाहीर केलेल्या स्थितीनुसार, घुमारेची दया याचिका ६ नोव्हेंबर २०२५ रोजी राष्ट्रपतींनी फेटाळली.

मानवतेला काळिमा फासणारी ही घटना ६ मार्च २०१२ रोजी जालना शहरातील इंदिरानगर परिसरात घडली. नराधम रवी घुमारेने पीडित चिमुकलीला चॉकलेटचे आमिष दाखवून तिचे अपहरण केले. यानंतर चिमुकलीवर अत्याचार केला. सत्र न्यायालयाने याप्रकरणी रवीला दोषी ठरवून १६ सप्टेंबर २०१५ रोजी फाशीची शिक्षा सुनावली. याविरोधात त्याने उच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र, जानेवारी २०१६ मध्ये उच्च न्यायालयानेदेखील त्याची फाशीची शिक्षा कायम ठेवली. उच्च न्यायालयाच्या निर्णयाला त्याने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. मात्र, तेथेही त्याला दिलासा मिळू शकला नाही. आता राष्ट्रपतींनीही त्याची दयेची याचिका फेटाळून लावली.

दुरावलेली ९८ टक्के मुले पुन्हा पालकांच्या हवाली

मुलांच्या प्रत्येक प्रकरणाला अत्यंत गांभीर्याने आणि सहानुभूतीने प्राधान्य देतात. बचपन बचाओ आंदोलन विरुद्ध भारत सरकार या खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार, अल्पवयीन मुलांच्या बेपत्ता होण्याच्या सर्व प्रकरणांची नोंद अपहरणाची प्रकरणे म्हणून केली जाते. आमचे प्रयत्न अविरतपणे सुरू आहेत आणि प्रत्येक बेपत्ता मुलाचा शोध लागेपर्यंत शोधकार्य थांबत नाही, असे पोलीस दलाच्या पोस्टमध्ये पुढे म्हटले आहे.

ऑस्ट्रेलियात ज्यू धर्मीयांवर दहशतवादी हल्ला, १२ जण ठार

की, हा हल्ला सिडनीच्या ज्यू समुदायाला लक्ष्य करण्यासाठी होता. बाँडी बीचवर 'हनुका बाय द सी' नावाच्या कार्यक्रमासाठी शेकडो लोक जमले होते. तेथे हनुका या ज्यू सणाच्या आरंभानिमित्त उत्सव साजरा केला जात होता.

एका नागरिकाने चित्रीत केलेल्या आणि ऑस्ट्रेलियन दूरचित्रवाणी वाहिन्यांवर प्रसारित झालेल्या चित्रीकरणात एक व्यक्ती एका बंदूकधाऱ्याला पकडून त्याचे शस्त्र हिसकावून घेताना आणि नंतर तेच शस्त्र त्याच्यावर रोखताना दिसत आहे. मेलबर्नचा रहिवासी असलेल्या ३२ वर्षीय लॅकलान मोरनने असोशिएटेड प्रेसला सांगितले की, गोळीबाराचा आवाज ऐकला, तेव्हा तो जवळच आपल्या कुटुंबाची वाट पाहत होता. त्याने आपल्या भावासाठी आणलेली बीयर खाली टाकली आणि तो पळाला. त्याला सुमारे पाच मिनिटे अधूनमधून गोळीबाराचा आवाज ऐकू येत होता. प्रत्येकाने आपल्या चीजवस्तू खाली टाकल्या आणि पळू लागले, लोक रडत होते, ते खूप भयानक दृश्य होते, असे मोरन म्हणाला.

पोलिसांना संशयिताच्या वाहनात तात्पुरते स्फोटक उपकरण सापडले आहे. गोळीबाराची खबर मिळताच सायंकाळी ६.४५ च्या सुमारास कॅम्पबेल परेड येथे आपत्कालीन सेवा दलांनी धाव घेतली.

पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, या घटनेत हानी झालेल्या सर्व लोकांच्या सोबत आम्ही आहोत. हल्ल्याची दृश्ये धक्कादायक आणि त्रासदायक आहेत.

इस्रायलचे राष्ट्राध्यक्ष आयझॅक हर्झोग यांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे. ते म्हणाले की, सिडनीमधील आमच्या ज्यू भगिनी आणि बांधवांप्रती आमच्या संवेदना आहेत, ज्यांच्यावर हनुकाची पहिली मेणबत्ती पेटवण्यासाठी जात असताना क्रूर दहशतवाद्यांनी हल्ला केला.

याआधी १९९६ मध्ये टास्मानियामधील पोर्ट आर्थर शहरात एका बंदूकधाऱ्याने ३५ लोकांना ठार केले होते. त्यानंतर सरकारने बंदुकीचे कायदे कठोर केल्याने ऑस्ट्रेलियात शस्त्रे मिळवणे सोपे राहिलेले नाही. २०२२ मध्ये क्वीन्सलँड राज्यातील ग्रामीण भागात ख्रिश्चन अतिरेक्यांनी दोन पोलीस अधिकाऱ्यांना गोळ्या झाडून ठार केले होते. त्या घटनेतील तीन हल्लेखोरांना वायंबिला प्रदेशात सहा तासांचा वेढा घातल्यानंतर अधिकाऱ्यांनी ठार केले.

वानखेडेवर लिओनल मेस्सीचा बोलबाला

इंडिया (सीसीआय) येथील पॅडल जीओटी क्लब स्पर्धेत सहभागी झाल्यानंतर तो सह खेळाडू लुईस सुआरेज आणि रॉड्रिगो डी पॉलसोबत वानखेडेवर दाखल झाला. तासाभरात वानखेडेवर चाहत्यांना अभिवादन करताना त्याने सुआरेज, पॉलसोबत मैदानाला फेरी पूर्ण केली. तिघांनी वानखेडे स्टेडियमवर आपल्यास पाहण्यास आलेल्या चाहत्यांना निराश केले नाही आणि त्यांच्या दिशेने फुटबॉलचे चेंडू धाडले. 'प्रोजेक्ट महादेवा' अंतर्गत निवडण्यात आलेल्या युवा खेळाडूंना मेस्सीने फुटबॉलचे धडे दिले. सचिनने याप्रसंगी मेस्सीला आपली स्वाक्षरी केलेली १० क्रमांकाची जर्सी भेट दिली, तर मेस्सीने त्या बदल्यात सचिनला फुटबॉल भेट स्वरूपात दिला. भारतीय फुटबॉल संघाचा माजी कर्णधार सुनील छेत्री, अखिल भारतीय फुटबॉल महासंघाचे (एआयएफएफ) माजी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल, अमृता फडवणीस, अभिनेता अजय देवगण आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

गुणवान खेळाडू मिळतील - मुख्यमंत्री

'प्रोजेक्ट महादेवा'मधून नक्कीच गुणवान खेळाडू मिळतील, अशी आशा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. राज्य शासनाचा या महत्त्वाच्या उपक्रमातून फुटबॉलमधील प्रतिभेचा (१३ वर्षांखालील) शोध घेऊन उच्च दर्जाचे खेळाडू घडवण्यात येतील. या उपक्रमांतर्गत शिष्यवृत्ती, परदेशी प्रशिक्षकांकडून जागतिक दर्जाचे प्रशिक्षण आणि सर्वांगीण विकासाची संधी दिली जाणार आहे. निवडलेल्या ६० खेळाडूंची (३० मुले, ३० मुली) ५ वर्षांची संपूर्ण निवासी शिष्यवृत्ती मिळणार आहे. तसेच अव्वल खेळाडू नक्कीच फिफा विश्वचषकामध्ये खेळतील, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, गॉट टूर प्रमोटर सत्तादूर दत्ता, जिंदाल ग्रुपचे पार्थ जिंदल, वेदना जिंदल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project (www.smart-mh.org)

E-TENDER NOTICE NO :- (2025_DOAWB_1257129)

Construction of Processing Shed 875.26 SQM, Integrated Packhouse 16 MT (9x18 Mtr), Precooling Unit 24 MT, Staging Room 30 MT

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. **Shreeagro Krushi Farmers Producer Company Limited, Dahiwadi Tal: - Maan Dist: - Satara** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned works. The estimated cost of work is **Rs.170.46 lakhs (Including GST).** The last date for submission of online bid is **14/01/2026 up to 3.00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

District Implementation Unit, SMART Project Dist. Satara

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

निविदा अधिसूचना

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** करंजाडी, आडवली आणि वैभववाडी येथे अभियांत्रिकी विभागासाठी पीवे स्टोअर्स बांधकाम, तसेच रत्नागिरी आणि कणकवली स्थानकांवर एस अँड टी स्टोअर्सचे बांधकाम. **निविदा अधिसूचना क्रमांक : केआर-आरएन-डिव्हायसीईडब्ल्यू-स्टोर-2025-39 दिनांक: 15/12/2025**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹ 47,54,660.03/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 22/12/2025, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 05/01/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 6 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

निविदा अधिसूचना

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील वैभववाडी स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्र.1 वरील शौचालयाच्या दुरुस्तीचे काम. **निविदा अधिसूचना क्रमांक : केआर/आरएन/डिव्हायसीईडब्ल्यूवीबीडब्लूटीबीआर/2025-38 दिनांक: 15/12/2025**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹ 6,67,892.86/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 22/12/2025, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 05/01/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 4 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

मयत प्रतिवादीच्या कायदेशीर वारसास नोटीस (नियम क्र. २२, नियम ४)

जाहीर नोटीस

रे. क. नं. ८७/२०१८
निशाणी - ६०/ड

(मा. एस. डी. बागल कोर्ट शाहूवाडी)

शाहूवाडी येथील सह दिवाणी न्यायाधीशसो क. स्तर, शाहूवाडी यांचे न्यायालयात...

पांडुरंग रामा जाधव मयत वारस वगैरे ...वादी

विरुद्ध

५. जगुबाई केशव माने वगैरे ...प्रतिवादी

मयत प्रतिवादी नं. ५.५ - उषा विलास पाटीलचे नियोजित वारसास.

प्रति, **प्र. वादी नं. ५.५/ब.- प्रस्तावित वारस - अक्षय विलास पाटील**
व. व. २२, धंदा : शिक्षण, रा. मु. जांबुर, पो. विरळे, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर.

सदर नियोजित ५.५/ब. नियोजित वारसास, ज्यापेक्षा वादी पांडुरंग रामा जाधव मयत वारस वगैरे यांनी जगुबाई केशव माने यांचे प्रस्तावित वारस ५.५ उषा विलास पाटील मयत वारस वगैरे यावर सन २०१८ इ. रोजी या न्यायालयात दिवाणी दावा दाखल केला असून; त्यानंतर सदरहू प्रतिवादी प्रस्तावित वारस नं. ५.५ उषा विलास पाटील हे मरण पावले आहे आणि ज्यापेक्षा सदरहू वादी ह्या न्यायालयात अर्ज करून त्यात मयत उषा विलास पाटील यांचे तुम्ही कायदेशीर वारस आहात, असे म्हटले आहे व त्याच्या जागी तुम्हास प्रतिवादी करण्याची आपली इच्छा दर्शविली आहे.

त्यापेक्षा सदरहू दाव्याचा जबाब देण्याकरिता तारीख **२८/०१/२०२६** रोजी सकाळचे १०.३० वाजता ह्या कोर्टात हजर राहण्याविषयी तुम्हास यावरून समन्स करण्यात येते आहे व सदरी लिहिलेल्या दिवशी तुम्ही हजर न झाल्यास तुमच्या परोक्ष सदरहू दाव्याची चौकशी होऊन ठराव केला जाईल. तसेच तुम्हास अशीही नोटीस देण्यात येत आहे की, निर्दिष्ट केल्या तारखेस किंवा तिच्यापूर्वी बजावणीसाठी पत्ता लिहून देण्यास तुम्ही कसूर केल्यास तुमच्या बचावाकडे लक्ष देण्यात येणार नाही. आज तारीख १०/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले. हुकुमावरून

सही/-
क. लिपिक

(शिक्का)

सही/- सहा. अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, क. स्तर, शाहूवाडी, जि. कोल्हापूर

तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, राधानगरी, ता. राधानगरी

यांचे कार्यालयाकडील आदेश जा.क्र./सनिरा/निवडणूक कक्ष/क वर्ग/पतसंस्था/ प्रा.म.यादी कार्य./ सन-२०२५, दि. १२/१२/२०२५.

परिशिष्ट-अ

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ नियम ४ **(III)** नुसार क प्रवर्गातील, श्री संत बाळूमामा महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., सावर्डे पाटणकर, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक सन २०२५ ते २०३० ची प्रारूप मतदार यादी अंतिम करणेचा कार्यक्रम प्रसिद्धी.

अ . नं.	कार्यक्रमाचा तपशील	दिनांक व वेळ
१.	प्रारूप मतदार यादी प्रसिद्धी	दिनांक- १५.१२.२०२५, वेळ स. ११ वा.
२.	प्रारूप मतदार यादीवर दावे, हरकती व आक्षेप मागविणे	दिनांक-१५.१२.२०२५ ते दिनांक-२२.१२.२०२५ वेळ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत
३.	प्रारूप मतदार यादीवरील आक्षेप व हरकतीवर निर्णय	दिनांक- २९.१२.२०२५, वेळ स. ११ वा.
४.	अंतिम मतदार यादी जाहीर करणे	दिनांक- २९.१२.२०२५, वेळ स. ११ वा.

टीप-सदरचा प्रारूप मतदार यादी कार्यक्रम तलाठी व ग्रामपंचायत कार्यालय तसेच जि. म. सह. बँक शाखा व संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करणेत आला आहे.

स्थळ - राधानगरी
दिनांक - १२.१२.२०२५.

(शिक्का)

सही/- (अमित व्ही. गराडे)
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, राधानगरी

HDFC BANK
We understand your world

नोंदणीकृत कार्यालय : एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई – ४०० ०१३ व त्यांच्या एका रिटेल पोर्टफोलिओ मॅनेजमेंटचे कार्यालय : एचडीएफसी बँक लि., १ ला मजला, आय – थिंक टेक्नो कॅम्पस, कांजूरमार्ग (पूर्व), मुंबई – ४०० ०४२.

लिलाव विक्री सूचना

कर्जदारांना विशेषत: व आम जनतेस याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, खालील निर्देशित खात्यांअंतर्गत गहाण सोन्याचे दागिने / सीक्युरिटींचा जाहीर लिलाव करण्याचे प्रस्तावित आहे. एचडीएफसी बँक लिमिटेड (बँक) यांच्याद्वारे कर्जदारांना थकित कर्ज चुकते करण्यासाठी सातत्याने सूचना पाठवूनही,कर्जदारांकडून त्यांच्याद्वारे स्वाक्षरित/स्वीकृत कर्ज कराराच्या अटींनुसार प्रदानात कसूर केली असल्याने कर्जदारांचे सोन्याचे दागिने/सीक्युरिटीचा लिलाव करण्यात येत आहे. बँकेने कर्जदारांना सूचनाही जारी केली आहे ज्यांअंतर्गत खालील खात्यांअंतर्गत त्यांच्या संपूर्ण थकित रकमेचे प्रदान करण्यासाठी ७ दिवसांचा कालावधी देण्यात आला होता. यामध्ये कसूर झाल्यास, बँकेला पुढील सूचना न देता संपूर्ण गहाण सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करण्याचे स्वातंत्र्य असेल. यासंदर्भात कर्जदारांकडून हेळसांड झाली व प्रदान करण्यात कसूर झाली, त्यामुळे बँकेने गहाण ठेवून घेणारे म्हणून कर्ज करारांतर्गत त्यांच्या हक्कांचा वापर करून संपूर्ण सोन्याचे दागिने/ सीक्युरिटीजचा ताबा घेऊन लिलावाद्वारे विक्री करण्याचा व कर्जदारांद्वारे बँकेस देय थकबाकीची वसुली करण्याचा निर्णय घेतला आहे.

लिलाव खालील निर्देशित शाखांमध्ये दि. २२.१२.२०२५ रोजी दु. ३.३० वाजल्यापासून आयोजित करण्यात येईल. वरील निर्देशित कोणत्याही गहाण सीक्युरिटीचा लिलाव आयोजित वा पूर्ण होऊ न शकल्यास सदर लिलाव पुढील कोणत्याही तारीख व वेळेवर आयोजित वा प्रक्रिया करण्याचा अधिकार बँकेकडे राखून आहे.

कर्ज क्रमांक	कर्जदाराचे नाव	कर्ज रक्कम	लिलावाचे ठिकाण
७५६८२३४३	सचिन गजानन शिंदे	१३२९००	एचडीएफसी बँक लि., कृष्णा रजनी अव्हेन्यू, कुडाळ पोस्ट ऑफिस जवळ, गणेशनगर, कुडाळ, महाराष्ट्र – ४१६५०२
७५५५१२४५	नितीन गंगाराम बेनेरे	४८८९००	एचडीएफसी बँक लि., तळ मजला, पदमश्रद्धा निवास, नर्सरी रोड, दापोली, जि. रत्नागिरी – महाराष्ट्र – ४१५७१२
७५८७४७०४	जयदीप जयंत पालकर	३५७००	
७५५८०००४	दीपराज दामोदर मेस्त्री	४३६००	अप्पर तळ मजला, हॉटेल डायमंड, मु. पो. देवगड, देवगड, महाराष्ट्र ४१६६१२
७४८३७३६८	अनमोल विजय शाहा	६१०००	तळ मजला, खटोड प्लाझा, सीएस क्र. १२१०२, प्लॉट क्र. ७३, अपना बाजार जवळ, इचलकरंजी, इचलकरंजी, महाराष्ट्र

लिलाव ''जशी आहे जेथे आहे'' व ''जशी आहे जी आहे'' तत्त्वावर आयोजित करण्यात येईल व सदर सोन्याच्या दागिन्यांचा दर्जा, शुद्धता, कॅरेटेज, वजन वा मूल्य यासंदर्भात बँक कोणतेही सादरीकरण करीत नाही वा हमी घेत नाही. इच्छुक खरेदीदारांची ही जबाबदारी असेल की, त्यांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी सदर सोन्याच्या दागिन्यांचा दर्जा, शुद्धता, कॅरेटेज, वजन वा मूल्य यासंदर्भात पडताळणी, परीक्षण व खात्री करून घ्यावी व याकरिता वरील निर्देशित पत्त्यावर इच्छुक खरेदीदारांना लिलाव आयोजित करण्याच्या ४५ मिनिटे अगोदर तज्ज्ञाच्या सल्ल्यासह वा सल्ल्याशिवाय स्वखर्चाने व मूल्याने परीक्षण करण्याची मुभा असेल. सर्व बोली या बँकेद्वारे यासंदर्भात निश्चित केलेल्या किमान राखीव मूल्याच्या अधीन असतील. लिलाव मूल्य हे आयबीजेए (इंडिया बुलियन ॲन्ड ज्वेलर्स असोसिएशन लि.) नुसार आदल्या दिवसाच्या समाप्ती वेळेनुसार सोन्याच्या दरानुसार असेल. सदर लिलावाच्या अनुषंगाने लिलाव प्रक्रिया व विक्री (काही असल्यास) ही बँकेद्वारे त्यांच्या अखत्यारित योग्य असल्याप्रमाणे लागू पुढील अटी व शर्तींच्या अधीन असतील. वरील निर्देशित कर्जदारांनी वरील निर्देशित लिलाव दिनांकापूर्वी त्यांच्या व्यक्तिगत कर्ज खात्यामध्ये कर्ज रकमेतील अटीनुसार बँकेच्या थकबाकीचे प्रदान केल्यास, सदर कर्जाच्या प्रतिभूतीतील गहाण दागिने पुढील कोणतीही सूचना न देता बँकेकडून स